आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते महाप्रसादाचे वितरण >> पान 2
जनतेचा कौल नाकारण्याचा मविआचा केविलवाणा प्रयत्न >> पान 3
मेहकर मतदारसंघात विकासकामांना खंड पडू देणार नाही, पराभव झाला तरी विकासकामे सुरूच राहतील >> पान 4

सुविचार
ध्येय साध्य करण्यासाठी समर्पण आणि संयम आवश्यक आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 109 ■ शुक्रवार, दि. 29 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों... शुभमनला 'या' अभिनेत्रीची ऑफर! म्हणाली, 'आमचं जुळवून...'
आतील पान

# महायुती सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी

## ५० वर्षांवरील नेत्यांचा पत्ता कट होण्याची शक्यता, इच्छुकांची धाकधूक वाढली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आज रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहे. दिल्लीत अमित शाहांच्या निवासस्थानी रात्री साडेनऊ वाजता ही बैठक होईल. अमित शाहांच्या भेटीसाठी अजित पवार सकाळीच दिल्लीत दाखल झाले आहेत. देवेंद्र फडणवीस दुपारी साडेतीन वाजता दिल्लीकडे निघणार आहेत. तर एकनाथ शिंदे दुपारी ४ वाजता दिल्लीला रवाना होतील. या भेटीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचा तिढा सुटणार का याची उत्सुकता आहे.**

याचदरम्यान नव्या सरकारमध्ये तरुण चेहऱ्यांना देखील संधी मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. काही ज्येष्ठ नेत्यांचे पत्ते कट होत तरुण चेहऱ्यांना देखील मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे.

दिल्लीतील बैठकीत आज मुख्यमंत्रिपदाबाबत निश्चिती झाल्यानंतर काही मंत्र्यांच्या नावांवर देखील शिक्कामोर्तब होणार आहे. यामुळे आज सकाळपासून सागर बंगल्यावर आमदारांची रिघ पाहायला मिळत आहे. काल दिवसभरात देखील महायुतीमधील अनेक आमदार सागर बंगल्यावर दाखल झाले होते. अनेक आमदारांमध्ये मंत्रिपदावरुन रस्सीखेच सुरु असल्याची माहिती मिळत आहे. मात्र



महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात युवा आमदारांना जास्त संधी मिळणार असल्याचं सांगितलं जात आहे. पुढील निवडणुकीत फायदा व्हावा, यासाठी आतापासून तयारी केली जाणार आहे. त्यामुळे ५० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या आमदारांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार नाही, असं सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात येत आहे. त्यामुळे ज्येष्ठ आमदारांचा धाकधूक वाढल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भाजपला सर्वाधिक २० ते २५ मंत्रिपदे–

विधानसभेच्या निकालानंतर आता मुख्यमंत्रिपदापासून मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युलावर देखील महायुतीमध्ये चर्चा सुरु झाली आहे. महायुतीमध्ये मंत्रिमंडळाचा अंदाजित फॉर्म्युला २१, १२, १० असा असू शकतो. यात भाजपला सर्वाधिक २० ते २५ मंत्रिपदे, त्यानंतर शिवसेनेला १० ते १२ आणि राष्ट्रवादीला ७–९ मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे. ही प्राथमिक चर्चा असून यामध्ये प्राथमिक केलेली वाटाघाटी असल्याचं सांगण्यात येत आहे.

अमित शाह, नरेंद्र मोदींच्या निर्णयाला आमच्या पक्षाचा पाठिंबा– एकनाथ शिंदे

अमित शाह, नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील त्याला आमच्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. महायुतीचा जो उमेदवार असेल त्याला पाठिंबा द्यायला मी इथे उभा आहे, एकनाथ शिंदेंनी स्पष्टपणे सांगितले. कुठही घोडं अडलेलं नाही. मी कुठेही काही अडून धरलेलं नाही, असंही एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही नाराज वगैरे नाही, आम्ही नाराज होणारे नाही लढणारे लोक आहोत. एवढा मोठा विजय मिळाला, आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय असा ऐताहासिक विजय असल्याचं एकनाथ शिंदेंनी सांगितले.

## शिवसेना पक्षप्रमुखांचे विचार सोडले त्यांना आता पश्चाताप होत आहे गुलाबराव पाटील यांची ठाकरेंवर टिका



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : शिवसेना पक्षप्रमुखांचे विचार सोडले त्यांना आता पश्चाताम होत आहे, असा टोला शिवसेना शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे यांना लगावला. बाळासाहेबांनी सांगितले होतं ज्या दिवशी काँग्रेस सोबत जाईन त्या दिवशी माझे दुकान बंद करेन, आता तिच परिस्थिती आली आहे. यातून आता लेट आये दुरुस्त आये असं म्हणावे लागेल, शिवसेना पक्षप्रमुखांचे विचार सोडले त्यांना आता पश्र्चाताप होत आहे. परमेश्र्वर त्यांचे भले करो, असा टोलाही ठाकरे यांना गुलाबराव पाटील यांना लगावला.एकमेकांसोबत असताना एकमेकांसोबत चर्चा करून निर्णय घ्यावे लागतात, प्रमोद महाजन ते गोपीनाथ मुंडे यांच्यापासून सुरू असलेली ही परंपरा आजही सुरू आहे. असे मत शिवसेना शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांनी व्यक्त करीत ठाकरेंवर टिका केली.

## विरोधकांनी ईव्हीएमबाबत आरोप करण्यापेक्षा ते सिद्ध करावे चंद्रकांत पाटील यांचा विरोधकांना इशारा



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : निकालाबाबत विरोधकांकडून ईव्हीएमबाबत आरोप करण्यापेक्षा ते सिद्ध करावे, असे असे चॅलेंज भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी विरोधकांना दिला. ते ठाणे येथे माध्यमांशी बोलत होते. संघटनामध्ये काम करताना पक्ष श्रेष्ठी लक्ष्य ठेवत असतात. निवडणूक झाल्यावर निकाल विश्र्लेषण करण्यात आले आहे. भाजप नेहमी नवीन नेतृत्व शोध घेत असते. त्यांना जवाबदारी देते. राजस्थान आणि मध्यप्रदेश प्रमाणे नवीन प्रयोग राज्यात राबविण्याबात मला कल्पना नाही. पक्षाची केंद्रीय समिती असून त्यात विविध विषय चर्चा होऊन त्यात वेगवेगळ्या जवाबदारी वाटप करण्यात येईल.सर्वो च्च न्यायलयाने ईव्हीएम बाबत स्पष्ट मत मांडले असून सर्व आरोप मोडीत काढले आहे. एकनाथ शिंदे यांच्या पत्नी यांनी देखील विविध तीर्थक्षेत्र स्थळी पूजा करत होत्या, त्याच प्रमाणे भाजप कार्यकर्ते देखील पूजा करून वेगवेगळ्या मागणी केल्या आहेत.आमचे नेते कोणाला मंत्री पद द्यावचाये याबाबत निर्णय घेतील. महिला आमदार आणि मंत्री भाजपचे अधिक आहे. राऊत कधीच फडणवीस आणि भाजपवर मनापासून बोलत नव्हते ते एक रोल पार पाडत होते. अशी टिका भाजपचे आमदार चंद्रकात पाटील यांनी केली.

## सांगलीत भीषण अपघात; अंकली पुलावरुन कार कोसळली, तिघांचा मृत्यू

**सांगली/प्रतिनिधी** :अंकली नजीकच्या कृष्णा नदी पुलावरुन चारचाकी गाडी नदीपात्रात कोसळून तिघांचा मृत्यू झाल्याची भीषण घटना घडली आहे. तर या अपघातात तीनजण गंभीर जखमी झाले आहेत. कोल्हापूर इथून लग्नकार्य आटपून सांगलीला परत येत असताना रात्री १ च्या सुमारास हा अपघात घडला. भरधाव गाडीवरील ताबा सुटल्यानं हा अपघात घडला, अशी माहिती मिळाली आहे. या अपघातातील मृत व्यक्तींमध्ये प्रसाद खेडेकर (वय ४०), प्रेरणा प्रसाद खेडेकर (वय ३५) आणि वैष्णवी संतोष नार्वेकर (वय २३) या तिघांचा समावेश आहे. तर साक्षी संतोष नार्वेकर (वय ४२), वरद संतोष नार्वेकर (वय २१) आणि समरजित प्रसाद खेडेकर (वय ५) अशी जखमींची नावं आहेत. हे सर्वजण सांगलीतील आकाशवाणी येथील गंगाधर कॉलनीमध्ये राहणारे असून सर्व कुटुंब लग्नकार्यासाठी कोल्हापूर इथे गेले होते. दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरचा अपघात कोल्हापूर जिल्ह्यातील उदगाव हद्दीत घडला असल्यानं याची नोंद उदगाव पोलीस ठाण्याम ध्ये झाली आहे. अपघातानंतर जखमींना सांगलीच्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलंय.

## राष्ट्रवादी अन् शिवसेनेला केंद्रात मंत्रिपद; शिंदेंना स्थान?; दिल्लीत खलबतं



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला राज्यात मोठा फटका बसला होता. राज्यातील ४८ पैकी केवळ १७ जागांवरच महायुतीला विजय मिळवता आला. त्यामध्ये, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ १ जागा मिळाली, तर शिंदेंच्या शिवसेना पक्षाला ७ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे, केंद्रातील एनडीए सरकारच्या स्थापनेवेळी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला एक मंत्रीपद देण्यात आले, पण अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोदी सरकारने वेटींगवर ठेवले होते. मात्र, आता विधानसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा केंद्रातील मंत्रिपदाचा मार्गही मोकळा झाला आहे.

महायुतीच्या सत्तास्थापनेच्या वाटपात राज्यातील मुख्यमंत्रीपद भाजपच्या वाट्याल जाणार आहे. त्यामुळे, शिवसेना व राष्ट्रवादीला उपमुख्यमंत्रीपद व इतर महत्त्वाची खाती देण्यात येतील, असं समीकरण सध्या पाहायला मिळत आहे. त्यासोबतच या दोन्ही पक्षांना केंद्रातही मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होताना अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एक मंत्रिपद देण्यात येईल. त्यामध्ये, राष्ट्रवादीचे खासदार सुनिल तटकरे किंवा प्रफुल्ल पटेल यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. तसेच, शिवसेना शिंदे गटालाही आणखी एक मंत्रिपद केंद्रात दिले जाणार आहे. त्यानुसार, खासदार श्रीकांत शिंदे हे मंत्री होतील, अशी सूत्रांची माहिती आहे. राज्यातील सत्तास्थापनेची आज महत्त्वाची बैठक राजधानी दिल्लीत होत असून शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे व राष्ट्रवादीचे अजित पवार हे दिल्लीत आहेत. भाजपच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांसोबत आज बैठक झाल्यानंतर रात्री ९ वाजता महायुतीच बैठक होणार असून या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय होणार आहेत. मात्र, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदावरील आपला दावा सोडल्यामुळे भाजपच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यातच, केंद्रातील भाजपकडून शिवसेना व राष्ट्रवादीला केंद्रात स्थान देऊन नाराजी दूर केली जाणार असल्याचे समजते. दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीला तब्बल २३७ जागांवर स्पष्ट बहुमत मिळालं असून शिंदेंच्या शिवसेनेला ५७ जागांवर यश मिळालं आहे, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४१ जागांव विजय मिळाला आहे. त्यामुळे, या दोन्ही पक्षांतील प्रमुखांचा आत्मविश्र्वास वाढला आहे. तरीही, भाजपला १३२ जागांवर यश मिळाल्याने भाजपचाच मुख्यमंत्री होईल हे आता निश्र्चित मानलं जात आहे. त्यामुळेच, महायुतीमधील इतर दोन्ही पक्षांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देऊन त्यांची राज्यातील राजी–नारजी दूर केली जाऊ शकते.

## पैशाच्या व दादागिरीच्या जोरावर मतदान खेचणाऱ्या नेत्यांपेक्षा मी माझ्या कामाच्या जोरावर तीन वेळा निवडून आले

### भाजप मंदा म्हात्रे यांची विरोधकांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : पैशाच्या आणि दादागिरीच्या जोरावर मतदान केले नाही. ९१ हजार लोकांनी मतदान केले एकही पैसा न देता सलग्न तीन वेळा निवडून आले. मंत्रीपेक्षा मी स्वतःला भारी समजते, असे आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या, त्या वाशी येथील तुंगा हॉटेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या. यावेळी आगामी योजनांचा आढावा घेत विरोधकांवर जोरदार टीका केली.

यावेळी त्या म्हणाल्या की, पैशाच्या आणि दादागिरीच्या जोरावर मतदान खेचणाऱ्या




नेत्यांपेक्षा मी माझ्या कामाच्या जोरावर तीन वेळा निवडून आले आहे. नवी मुंबईच्या जनतेने मला पाठिंबा दिला आहे. आगामी पाच वर्षांत नवी मुंबईत सौरऊर्जेवर आधारित विजनिर्मिती प्रकल्प राबवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. नागरिकांसाठी प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करण्याचे आश्र्वासन दिले. यावेळी मंदा म्हात्रे यांनी विरोधकांवर निशाणा साधत सांगितले,

विरोधकांनी केवळ टीका केली, पण आम्ही विकासकामे केली. आम्हाला घरोघरी भेटून पाठिंबा मागायची वेळ नाही, कारण जनतेला माहित आहे की नवी मुंबईचा खरा विकास कोण करतो.

नवी मुंबईच्या जनतेला माहित आहे की, शहराला कोणाच्या हातात सोपवायचे आहे. आमच्यावर विश्र्वास ठेवणाऱ्या नागरिकांनीच आम्हाला सतत निवडून दिले आहे. पैशाच्या आणि दादागिरीच्या जोरावर मतदान केले नाही. ९१ हजार लोकांनी मतदान केले एकही पैसा न देता सलग्न तीन वेळा निवडून आले.असे म्हणत विरोधकांचा चांगलाच समाचार बेलापूर मतदार संघाच्या भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी घेतला.

# एकनाथ शिंदेंनी जी भूमिका स्पष्ट केली तीच पक्षाची भूमिका

## शंभूराज देसाई यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : आमची काल भेट झाली नसल्याने आम्ही सहज भेटण्याकरिता आलो, एकनाथ शिंदे आता दिल्लीला जाणार आहे. त्या पूर्वी त्यांच्याशी चर्चा केली. यांच्यापेक्षा वेगळे काही नाही बैठक नव्हती, एकनाथ शिंदेनी जी भूमिका स्पष्ट केली तीच पक्षाची भूमिका आहे. अशी माहिती शंभूराज देसाई यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी शंभूराज देसाई म्हणाले की, शिवसेना हा पक्ष शिस्तबद्ध पक्ष आहे. आमच्या पहिल्या आमदारांच्या बैठकीमध्ये आम्ही पक्षाचे सर्व अधिकार हे मुख्य नेते एकनाथ शिंदेंना दिले आहेत. ते जो निर्णय घेतील ती पक्षाची भूमिका एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केली



आहे. मराठा समाज व इतर समाज असतील शिंदेंच्या नेतृत्वाखाली त्यांचे प्रश्र्न सुटले नव्हते ते प्रश्र्न मागच्या दोन अडीच वर्षात आपण सोडवले आहेत. खूप सवलती दिल्या, शिंदे यांनी कुठलाही घटक त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकर्तीमध्ये वंचित राहू दिला नाही. लोकांना लोकांसाठी ज्या नेत्यांनी केले. त्यामुळे ती आपलेपणाची भावना आहे. एकनाथ शिंदेंनी जी भूमिका स्पष्ट केली. तीच पक्षाची भूमिका आहे. शिवसेनेमध्ये काय निर्णय घेतील कशा प्रकारची पुढची वाटचाल असेल कशाप्रकारे संघटना पक्ष अधिक मजबूत करायचा याबाबतीत एकनाथ शिंदे जे धोरण ठरवतील आम्हाला सांगतील त्याप्रमाणे पक्ष अधिक मजबूत करण्याचे काम केवळ मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्र मध्ये आम्ही करू, मुख्यमंत्री कोण होणार कुणाला काय मिळणार आहे हे शिवसेनेचे अधिकार एकनाथ शिंदेंचे आहेत. त्या बाबत तेच निर्णय घेतील,सरकार स्थापनेच्या हालचाली सध्या सुरू आहेत.

त्यामुळे आता हे सरकार स्थापन झाले की सगळ्या हालचाली पूर्ण झाल्या की, स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या कामाला आम्ही सर्व लागणार आहोत. भाजपचे बावनकुळे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांची भूमिका त्यांनी मांडली आता सरकार बनते हालचाली सुरू झाल्यात एकदा सरकार झाल्यानंतर आम्ही त्याच कामाला लागणार आहोत. याबाबतीत आम्हाला आमदारांना काहीही बोलता येणार नाही, आम्ही याबाबतीतला सर्व निर्णय घेण्याचा अधिकार एकनाथ शिंदेंना दिला आहे.अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे आमदार शंभूराज देसाई यांनी दिली.

## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या ( सिंगल युज ) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत. निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.


# आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते महाप्रसादाचे वितरण

## नायगाव दत्तापूर येथे हरिनाम सप्ताह : हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर येथून जवळच असलेल्या नायगाव दत्तपुर येथे दि.२१ नोहेंबर ते २८ नोहेंबर २०२४ पर्यंत श्री संत ज्ञानेश्वर माउली संजीवन सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दि.२८ नोहेंबर २०२४ रोजी या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे कीर्तन व पुरी भाजी या महाप्रसादाने करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्याहस्ते पुरीभाजी महाप्रसादाचे वितरण करून महाप्रसाद वितरणाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात जाऊन माऊलीचे दर्शन घेतले. यावेळी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हा उपप्रमुख आशिष रहाटे, मेहकर शहर अध्यक्ष किशोर गारोळे, युवासेना प्रमुख ड. आकाश घोडे, डोनगाव सर्कल प्रमुख निंबाभाऊ पांडव, नायगाव दत्तपुरच्या सरपंच आशा विलास गवई, श्याम निकम, रवी निकम, विलास गवई, किशोर दुतोंडे, दिलीप पाटील, ज्ञानू पाटील, सुरेश डव्हळे, रामदास निकम, रूपराव निकम यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या महाप्रसादाचा परिसरातील हजारो भाविकांनी लाभ घेतला.






## खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों... शुभमनला 'या' अभिनेत्रीची ऑफर! म्हणाली, 'आमचं जुळवून...'

**मुंबई/प्रतिनिधी** : टीम इंडियाचा स्टार क्रिकेटर शुभमन गिल हा नेहमीच कोणत्या न कोणत्या कारणामुळे चर्चेत राहतो. शुभमन गिल त्याच्या मैदानातील खेळामुळे चर्चेत असतोच मात्र त्यासोबतच त्याचे लुक्स आणि अफेरच्या चर्चा देखील खूप रंगतात. बॉलिवूड स्टार्स आणि क्रिकेटर्समधील जवळीक काही नवीन नाही, अनेक क्रिकेटर्सनी बॉलिवूड अभिनेत्रींना डेट करून त्यांच्याशी लग्न देखील केलंय. शुभमन गिलचं नाव देखील अनेक अभिनेत्रींशी जोडलं जातं, आता अक्षय कुमार सोबत बॉलिवूड चित्रपटात काम केलेल्या एका अभिनेत्रीने तिला शुभमन गिलला डेट करायचंय अशी इच्छा व्यक्त केलीये.

अक्षय कुमार सोबत 'खेल खेल में' या चित्रपटात काम केलेली अभिनेत्री प्रज्ञा जयस्वाल हिने एका मुलाखतीत बोलताना म्हटलं की, 'तिला शुभमन गिल खूप क्युट वाटतो आणि ती त्याला डेट करू इच्छिते'. एका मुलाखतीदरम्यान मुलाखतकाराने प्रज्ञाच्या फोटोंखालील कमेंट्स तिला वाचून दाखवल्या. यात तिच्या एका फॅन्सनी लिहिले की, 'प्रज्ञा आणि शुभमन एक रोमँटिक कपल असते तर'. प्रज्ञाने उत्तर देताना म्हंटले की, 'तो खूप क्यूट आहे यार, चला तुम्हा सर्वांच्या मनासारखे व्हावे. तशीही मी सिंगल आहे, या वाक्याला खरं करून टाका. आमची जोडी जुळवा यार!'. प्रज्ञाला विचारण्यात आले की, तिला क्रिकेटरला डेट करायचंय का? यावर प्रज्ञा म्हणाली की, 'जर हे लिहिलंय तर हे होईलच. मला म्हणायचंय की मी कधीही कोणत्या क्रिकेटर विषयी माझ्या मनात कोणतीही गोष्ट ठेवलेली नाही. जर तो चांगला व्यक्त असेल आणि आमच्यात चांगलं जमत असेल तर का नाही?तमिळ आणि तेलगू सिनेश्रुष्टीमध्ये प्रज्ञा जयस्वाल हा खूप लोकप्रिय चेहेरा आहे. तिने काही दिवसांपूर्वीच अक्षय कुमारच्या खेल खेल मे या चित्रपटातून डेब्यू केला होता. या चित्रपटात तिचा अभिनय लोकांना फार आवडला मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करू शकला नाही. शुभमन गिलबद्दल बोलायचं झालं तर त्याच नाव आतापर्यंत सारा तेंडुलकर आणि अभिनेत्री सारा अली खान यांच्याशी जोडलं गेलं आहे.

## पाणी पिऊन होतो Weight Loss? काय आहे खरं कारण...

'बारीक व्हायचे असेल तर भरपूर पाणी प्या', हे तुम्ही अनेकदा ऐकले असेल. वजन कमी करण्यासाठी पाणी सर्वोत्तम मानले जाते. पण तुम्हाला खरोखर माहित आहे का की वजन कमी करण्यासाठी पाणी तुम्हाला कसे मदत करेल आणि तुम्ही ते कसे प्यावे. जास्त पाणी प्यायल्याने तुमचे वजन कमी होणार नाही, परंतु त्याचे योग्य सेवन केल्यास तुम्हाला फायदा होईल. जर तुम्हीही वजन कमी करण्याच्या विचारात असाल तर सर्वप्रथम पाणी आणि त्याचे परिणाम नीट जाणून घ्या.



स्त्री-पुरुषांच्या गरजा वेगवेगळ्या असतात

पाणी केवळ तुमचे वजन कमी करण्यास मदत करत नाही तर तुम्हाला हायड्रेट ठेवते आणि तुमचे पचन आणि स्नायूंचे कार्य सुलभ करते. पण स्वत:ला हायड्रेट ठेवण्यासाठी महिला आणि पुरुषांची गरज वेगळी असते. महिलांसाठी दररोज सुमारे ९ ग्लास पाणी पुरेसे आहे, तर पुरुषांसाठी ही संख्या दररोज सुमारे १३ ग्लास आहे.

पाण्यामुळे भूक कमी होते

जास्त पाणी पिल्याने वजन कमी होते, असे संशोधनात सांगितले आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जास्त पाणी पिल्याने तुमची भूक कमी होते. जेव्हा तुमचे पोट भरलेले असते तेव्हा मेंदूपर्यंत सिग्नल पोहोचतात आणि तुम्ही जास्त अन्न खाऊ शकत नाही. तज्ज्ञांच्या मते, काहीही खाण्यापूर्वी एक ग्लास पाणी पिणे वजन कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते. एवढंच नव्हे तर कमी खाण्याकडे भूकेचा कल राहतो. एका संशोधनात, ५० पेक्षा जास्त वजन असलेल्या महिलांना आठ आठवडे प्रत्येक आहारापूर्वी नियमितपणे ५०० मिली पाणी दिले गेले. या सर्वांची भूक भागली. या सर्व महिलांच्या बॉडी मास इंडेक्समध्ये (बीएमआय) घट झाल्याचे संशोधनात आढळून आले.

कॅलरीज बर्न करण्यास उपयुक्त

अनेक संशोधनांनी हे सिद्ध केले आहे की, पाणी तुम्हाला कॅलरीज बर्न करण्यास मदत करते. एका संशोधनात, नियमितपणे खोलीच्या तापमानावर ५०० मि ली पाणी दिले गेले. सुमारे ९० मिनिटे पाणी प्यायल्यानंतर असे आढळून आले की, या सर्वांनी इतर लोकांपेक्षा २ ते ३% जास्त कॅलरी बर्न केल्या. वजन कमी करण्यासाठी लोक दिवसभर गरम किंवा कोमट पाणी पितात. पण या संशोधनात हेही आढळून आले की, सामान्य तापमानातील पाणी कॅलरीज बर्न करण्यात अधिक फायदेशीर ठरते. कारण शरीर स्वत:च हे पाणी पचनासाठी गरम करते, ज्यामुळे जास्त कॅलरीज वापरतात. आणि वजन कमी होते.

चयापचय वाढवा

अधिक पाणी पिण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तुमचे चयापचय सुधारणे. तुमची मेटाबॉलिज्म बरोबर असेल तर तुमचे वजन आपोआप कमी होईल. शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर काढण्यात पाणी महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळे तुमची पचनक्रियाही चांगली राहते आणि बद्धकोष्ठतासारख्या अनेक समस्यांपासून दूर राहते. हे मूत्रपिंड आणि यकृतासाठी फायदेशीर आहे. जेव्हा तुमचे शरीर योग्यरित्या टाकाऊ पदार्थ बाहेर टाकते तेव्हा कमी खराब चरबी जमा होते. त्यामुळे तुमचे वजन कमी होते.

## ताप, डोकेदुखी असेल तर दुर्लक्ष करु नका, होऊ शकतो 'हा' भयंकर आजार!

कधी पाऊस, कधी ऊन, कधी थंडी या दिवसात हवामानात सतत होणारा बदलामुळे विषाणूजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. व्हायरल इन्फेक्शनची सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ते एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतात. अनेकदा लोक सामान्य ताप आणि व्हायरल ताप समजून दुर्लक्ष करतात. मात्र ताप ,डोकेदुखी यासारखे आजार असतील तर वेळीच सावध व्हा. कारण भारतात जापानी तापाची साथ पसरली आहे.हा ताप सामान्य तापमान नाही तर अतिशय धोकादायक तापमान आहे. त्यामुळे रुग्णाला जीव गमवावा लागतो. याच तापाचा कहर सध्या भारतात पसरला आहे. मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्ये जापानी तापाची लक्षणे नष्ट करण्यासाठी मोठी मोहीम राबवली जात आहे. अशा परिस्थितीत १ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ देतात.



जापानी इन्सेफलाइटिसचा उद्रेक दरवर्षी देशातील सुमारे २० राज्यांमध्ये पसरतो. विशेषत: उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये २०१७ मध्ये जापानी उष्णतेमुळे एकाच दिवसात ३० लोकांचा मृत्यू झाला होता. बिहारमध्ये दरवर्षी १५० हून अधिक मुलांचा याच रोगामुळे मृत् झाला होता. डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार, या आजाराचे पहिले प्रकरण १८७१ मध्ये समोर आले होते. डासांपासून पसरणारा हा व्हायरस डेंग्यू, पिवळा ताप, आणि पश्चिमी नील व्हायरसच्या जातीचा आहे.

एन्सेफलायटीस किंवा जापानी ताप म्हणजे काय?

एन्सेफलायटीस हा जीवघेणा आजार आहे. हा एक गंभीर आजार आहे ज्यामध्ये तुमच्या मेंदूला सूज येते. यासाठी पूर्व-उपचार आवश्यक आहेत. या आजाराची शिकार कुणीही होऊ शकते. पण याचा सर्वात जास्त धोका लहान मुले आणि म्हाताऱ्या लोकांना असतो.

जापानी एन्सेफलायटीसची लक्षणे...

जपानी एन्सेफलायटीसमध्ये ताप आल्यावर मुलांची विचार करण्याची क्षमता, समजून घेण्याची क्षमता आणि ऐकण्याची क्षमता कमी होते. कडक तापबरोबरच पुन्हा पुन्हा उलटीचा त्रास होतो. हा आजार ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात जास्त पसरतो. आणि १ ते १४ वय वर्षांच्या मुलांना आपल्या तावडीत घेतो.

जापानी एन्सेफलायटीस टाळण्यासाठी उपाय...

- नवजात मुलाचे वेळेत लसीकरण करणे.
- स्वच्छतेची काळजी घेणे.
- घाणेरडे पाणी जमा होऊ देऊ नये. सोबतच स्वच्छ आणि उकळलेले पाणी प्यावे.
- पावसाच्या सिजनमध्ये मुलांची व्यवस्थित काळजी घेणे.
- थोडाही ताप असल्यावर मुलांना डॉक्टरकडे घेऊन जाणे.

जपानी तापावर उपचार काय?

जपानी तापाच्या विळख्यात एकादी व्यक्तीला झाला असेल तर त्यानं त्यावर त्वरित उपचार घेणं गरजेचं असतं. जापानी तापाच्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये तात्काळ दाखल केलं जातं. त्याच्यावर तात्काळ उपचार सुरू करणंही आवश्यक असतं. त्याला ऑक्सिजन मास्कही लावला जातो. कारण जपानी ताप आलेल्या व्यक्तीला ऑक्सिजन मास्क लावला जातो. व्यक्तीची प्रकृती बिघडल्यास वॅक्सिनही दिलं जातं.

# मका: बदलत्या वातावरणात पर्यायी पीक

जगात तृणधान्य पिकाच्या उत्पादनामध्ये गहू व भात या पिकानंतर मक्याचा क्रमांक लागतो. मक्याच्या उत्पादन क्षमतेमुळे या पिकास धान्याची राणी म्हणुन ओळखले जाते. मका हे मानव आणि पशुंसाठी दर्जेदार खाद्य आहे. याव्यतिरिक्त विविध औद्योगिक विशेषतः इथेनॉलच्या निर्मितीत मोठया प्रमाणात वापर केला जात आहे. त्यामुळे येत्या काळात मक्याची मागणी सतत वाढुन शेतकऱ्यांना चांगले भाव मिळतील. वातावरणातील बदलावर उत्तम पर्याय आहे. तसेच रोजगार आणि निर्यातीची संधी उपलब्ध करुन देण्याची ताकद या पिकात आहे. आजकाल जनावरांच्या चाऱ्यांसाठी मुरघास बनवण्यासाठी याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.



मका हे उष्ण हवामानाला उत्तम प्रतिसाद देणारे पीक असले तरीही याची लागवड तिन्ही हंगामात करता येते. पाण्याचा योग्य निचरा होणारी, भारी ते मध्यम प्रतीची जमीन उपयुक्त असली तरीही कोणत्याही प्रकारच्या जमिनीत लागवड करता येते. पाणी धरुन ठेवणारी किंवा चिबड जमिनीमध्ये या पिकाची लागवड करु नये. जमिनीची खोल १५ ते २० सेंमी नांगरणी करुन वखराच्या ३ ते ४ पाळ्या दयाव्यात आणि शेवटच्या पाळी पुर्वी शेतात एकरी ६ ते ८ गाड्या शेणखत अथवा कंपोस्ट खत पसरुन घ्यावे. पेरणी करिता एकरी ६ ते ८ किलो बियाणे वापरावे. पेरणी पुर्वी कार्बोक्सीन ३७.५% ३ ग्रॅम अधिक थायरम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणेस चोळावे, त्यावर अॅझोटोबॅक्टर, पी. एस.बी., के.एम.बी. व ट्रायकोडर्मा यांची जैविक बिज प्रक्रिया करावी.

ऊन्हाळी हंगामात जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवाडयात ६० सेंमी अंतराच्या तिफणीने पेरणी करुन विरळणी ने दोन झाडातील अंतर १५ ते २० सेंमी ठेवावे व बियाणे पेरणीची खोली ४ ते ५ सेंमी असावी त्यापेक्षा कमी किंवा जास्त असु नये. टोकन पध्दतीने लागवड केल्यास बियाण्याचे योग्य अंतर राखता येईल. एकरी झाडांची संख्या ३३ ते ४० हजार अपेक्षित आहे.

मका पिकाकरिता एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.) नत्र ६२ किलो, स्फुरद ४० किलो व पालाश १२ किलो प्रति एकर शिफारस केली आहे. पेरणीच्या वेळी १६ किलो नत्र, संपुर्ण स्फुरद व पालाश ची खत मात्रा देण्यात यावी. पेरणी नंतर ३० दिवसांनी १६ किलो नत्र, व ५० दिवसांनी ३० किलो नत्राची मात्रा मुळाशी उखरून देण्यात यावी.

तणाच्या नियंत्रणासाठी २ ते ३ डवरणी सोबत पीक २५ ते ३० दिवसाचे असतांना मेसोट्रीऑन २.२७% अधिक अॅट्राझीन २२.७% ईसी या पूर्व मिश्रीत तणनाशकाचा गवत आणि रुंद पाणाचे तण व्यवस्थापनात उपयुक्त आहे.

मका पिकास ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन उत्पादनात वाढ होते. पिकाच्या संवेदनशील पिक अवस्थेत म्हणजेच तुरा बाहेर पडतांना, फुलोरात असतांना, दुधाळ अवस्थेत आणि दाने भरण्याचे वेळी पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा उत्पादनात लक्षणीय घट येते.

मक्याचे पिक ९० ते १०० दिवसात पक्व होते. कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि दाणे टणक झाल्यावर काढणी करावी. धान्यात ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के होईपर्यंत चांगले वाळवावे म्हणजेच साठवणुक केल्यास नक्कीच नुकसान होणार नाही. मका पिकाचे सरासरी प्रति एकरी उत्पादन लवकर ग्रेप्मारे वाणाचे १६ ते २० क्विंटल व मध्यम ते उशिरा येणारे वाणाचे एकरी २४ ते ३० क्विंटल मिळु शकते.

लेखक :
**उमेश घाटगे**
(विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर)

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जनतेचा कौल नाकारण्याचा मविआचा केविलवाणा प्रयत्न

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांचा पत्रकार परिषद आरोप

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला अभूतपूर्व यश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मिळाले आहे. तर महाविकास आघाडी लोकसभेला यश मिळाले ते महाराष्ट्राच्या जनतेमुळे मिळाले आणि विधानसभेमध्ये महाराष्ट्राच्या जनतेने नाकारल्यानंतर ईव्हीएम हॅक झाले, जनतेने दिलेला हा कौल नाकारण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे, अशा प्रकारे रडीचा डाव सुरू आहे.अशी टिका राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी आनंद परांजपे म्हणाले की,माझे जितेंद्र आव्हाड यांना खुले आव्हान आहे की, त्यांना जर वाटत असेल ईव्हीएम मशीन हॅक होते. तर त्यांनी त्यांचा आमदारकीचा राजीनामा द्यावा, महाराष्ट्रातील पहिली बॅलेट पेपरवर निवडणूक ही मुंब्रा कळवा विधानसभेत घेऊया, म्हणजे दूध का दूध पाणी का पाणी होईल. लोकसभेला ज्यावेळेस यश मिळाले त्यावेळेला महाराष्ट्राची जनता आमच्या मागे आहे आणि आता विधानसभा त्यांना जनतेने नाकारल्यानंतर ईव्हीएम हॅक होऊ शकते, अशा प्रकारची थियरी मविआ चे नेते समोर आणत आहेत. लोकशाहीमध्ये जनतेने दिलेला कौल मान्य करायचा असतो. महाराष्ट्रात २३५ पेक्षा जास्त जागा महायुतीच्या निवडून देत असताना एक विश्र्वास महायुती वर व्यक्त केला. ज्यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेने काँग्रेस बरोबर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाबरोबर युती केली.

महाविकास आघाडी केली, त्यावेळेला शिवसेनेचा मतदार हा शिवसेना पक्षापासून दूर होत होता. शिवसेनेला त्याचा अंदाज आला नाही. लोकसभेला देखील शिवसेनेचे नेतृत्व करत असलेले एकनाथ शिंदे यांचे सात खासदार निवडून आले २०१९ ला शिवसेना एकत्र होती. त्यावेळेला ५६ जागा विधानसभेला निवडून आल्या होत्या. त्यापेक्षा अभूतपूर्व यश शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मिळाले. त्यामुळे शिवसेना उबाठा ने




आत्मचिंतन करावे, अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्याचे काम महाराष्ट्रामध्ये केले. त्यांच्या नेतृत्वावर अन्याय करून ज्या वेळेला वेगळी राजकीय भूमिका आमचे नेते अजित पवार यांना घ्यावी लागली. त्यावेळी महाराष्ट्राची जनता त्यांच्या निर्णयाच्या बाजूने उभी राहिली आणि शरद पवार यांना स्पष्ट दाखवून दिले तुमच्या विचारांचा खरा वारसदार पक्षांचा नेता हे अजित पवार आहेत. राष्ट्रवादीचे उमेदवार नजीब मुल्ला यांनी देखील त्या मीटिंगमधे स्पष्ट केले होत लोकांच्या मनाविरुद्ध हा डीपी प्लॅन राबवणार नाही, विधानसभेच्या वेळेला शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस ने आपली भूमिका स्पष्ट केली होती. लोकांच्या मनाविरुद्ध कोणत्याही परिस्थितीत हा प्रारूप डीपी राबविला जाणार नाही. अशा प्रकारची चर्चा खासदार श्रीकांत शिंदे आणि नजीब मुल्ला यांची ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याशी झाली. निवडणुकीत ज्यांना हा मुद्दा कळला नाही कुंभकर्णाच्या झोपेमध्ये जे होते ते अचानक पणे आज कळव्यामध्ये बॅनर लावताना दिसत आहेत. महायुतीचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री पदाबाबतचा हा दिल्ली येथे होईल, महायुती एकसंघ आहे. माहायुतीचा जो काही निर्णय दिल्लीतील वरिष्ठ नेते घेतील हा महाराष्ट्रातील तीनही पक्षांना तो बंधनकारक राहील. असे सांगून महायुतीला खूप चांगले यश हे मुंबई शहर आणि उपनगरामध्ये मिळाले आहे. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मुंबई महापालिकेतच नाही तर इतरही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मिळेल, जनतेचा कौल अत्यंत स्पष्ट होता आणि तो महायुतीच्या बाजुने आहे. अजमेर शरीफ मंदिर प्रकारचा निर्णय न्यायप्रविष्ठ असल्याने जो योग्य तो निर्णय न्यायालय घेईल,असे ते म्हणाले. तसेच पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याला वाटतं की अजित पवार हे मुख्यमंत्री झाले पाहिजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वास्तवाला समजून वास्तवाला जाणून घेणारा पक्ष आहे. तर विजय शिवतारे यांचे ते व्यक्तिगत बोलणे असू शकते. असे म्हणत महाविकास आघाडीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी केला.

## महत्त्वाचे...

### सत्ताधाऱ्यांकडून सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे सूत्र वापरलं गेलं माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : पोटनिवडणूक, लोकसभा या पार्श्वभूमीवर नंतरच्या निवडणुकीचा निकाल धक्कादायक आहे. सत्ताधार्यांकडून सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे सुत्र वापरले गेले असा आरोप माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला. यावेळी माध्यमांशी बोलताना माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी निवडणुका हायजॅक करण्याचा प्रयत्न झालाय असा आरोप केला. तसेच शासकीय योजना हातात घेऊन, शासनाचा पैसा निवडणुकीत वापरण्याचा प्रयत्न झाला. आम्ही लाडकी बहिण योजना कायम ठेवू हे सांगण्यात आम्ही कमी पडलो, निवडणुकीत जातीय समिकरणंही वापरली गेली. जातीय समिकरणे, विषारी प्रचार आणि योजनांचा वापर असाच होत राहिला तर सामाजिक कार्यकर्ते निवडणुकीत उतरणे अवघड आहे. एकेकी मतदारसंघात ५० कोटी वाटले गेले, टेंडरमार्फत हा पैसा गोळा केला गेला.सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे सूत्र वापरले गेले.निवडणुका झाल्या आणि आज आम्ही परत सेफ झालो, पुढच्या ५ वर्षांनी परत जातीय-धार्मिक राजकारण डोकं वर काढेल, असा मतही यावेळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी व्यक्त केले.तसेच पत्रकारांच्या प्रश्र्नाचे निरासन केले.

### माझा पराभव करण्यासाठी उध्दव ठाकरे, शरद पवार आणि संजय राऊत यांनी निवडणूक हाताळली - पाटील



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** :कोणत्याही परिस्थितीमध्ये मला मुंबईमध्ये येऊ द्यायचे नाही यासाठी उद्धव ठाकरे, शरद पवार आणि संजय राऊत यांनी पण केला होता. त्यात माझे मित्र दीपक आबा साळुंखे हे त्यांच्या डावात फसले मतविभागणीमुळे माझा पराभव झाला असा गंभीर आरोप सांगोल्याचे शिवसेनेचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी केला आहे. निवडणूक निकालानंतर पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. माझा पराभव करण्यासाठी उध्दव ठाकरे, शरद पवार आणि संजय राऊत यांनी निवडणूक हाताळली. कोणत्याही परिस्थितीत मी मुंबईत येणार नाही यासाठी त्यांनी पण केला होता. असा आरोप ही त्यांनी केला.

### ५ बेकायदा इमारतीवर कारवाई होणार, केडीएमसी अधिकारी योगेश गोडसे यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : रेरा प्रकरणातील ६५ बेकायदा इमारतीवर कारवाईचे आदेश न्यायालयाने दिले आहे. ही कारवाई लवकर सुरु केली जाणार असल्याची माहिती केडीएमसी अधिकारी योगेश गोडसे यांनी दिली आहे.

या बाबत बोलताना सांगितले की, याचिकाकर्ते संदीप पाटील यांनी याचिका दाखल केली आहे. ६५ बेकायदा इमारती आहेत. त्या इमारती अनधिकृती घोषित केले आहे. येत्या ३ महिन्यात या इमारती पाडण्यात यावेत असे आदेश न्यायालयाने दिले आहे. महापालिकेच्या वतीने या सर्व रहिवासियांना न्यायालयाचे आदेश आहे. ते सगळ्यांना बंधनककारक आहे. कायदेशीर बाजू मांडण्याकरीता न्यायालयात दाद मागू शकतात. १९ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने दिलेली आदेश महापालिकेच्या यंत्रणेला बंधनकारक आहे. ही कारवाई आम्हाला अप्रिय असली तरी तरी ती करण्यासाठी आम्ही बंधनकारक आहोत.

### पैठणी चोरणारा चोरटा १२ तासात गजाआड, येवला शहर पोलीस पथकाची कारवाई



**नाशिक/प्रतिनिधी** : येवला शहरातील कोपरगाव रोड येथील लक्कडकोट पैठणी दुकानांमध्ये चोरट्याने चोरी करत महागड्या पैठणी लंपास केल्याची घटना घडली होती. या संदर्भात येवला शहर पोलीस स्थानकात तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपासाची सूत्र फिरवत १२ तासात आरोपीला गजाआड करत त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# शहीद प्रदीप घुगे अमर रहे...अमर रहे...

# अखेरची मानवंदना





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : दुसरबिड येथील प्रदीप पंढरीनाथ घुगे हे सीमा सुरक्षा दलाच्या त्रिपुरा राज्यातील आगरताळा येथे बांग्लादेश सीमेवर कार्यरत असताना हृदयविकाराच्या धक्क्याने निधन होऊन वीरमरण आले. हि घटना दि.२५ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास घडल्याचे समजले होते.यानंतर आगरतळा, कलकत्ता येथून इंदौरपर्यंत हवाई मार्ग व तेथून बाय रोड असा चार दिवसांच्या प्रवासानंतर सैन्य दलाच्या जवानांनी आकाशात बंदुकीतून तीन फैरी झाडून शहीद जवान प्रदीप घुगे यांना अखेरची मानवंदना दिली.

येथील प्रदीप पंढरीनाथ घुगे या वीरजवानाचा जन्म दि. २५ मार्च १९८५ रोजी दुसरबीड येथे झाला होता. शालेय शिक्षण सुध्दा दुसरबीड येथेच झाले. सन २००६ मध्ये बुलढाणा येथील बीएसएफ १२२ बटालियनच्या भरतीत प्रदीप जनरल ड्युटी (जीडी) मध्ये शिपाई पदावर भरती झाला होता. त्याने आतापर्यंत सेवेची १८ वर्षे पूर्ण केली होती व दोन वर्षांनंतर तो सेवानिवृत्त होणार होता. जुलै २०२४ च्या ३१ तारखेला तो सुटीवर घरी दुसरबीड येथे आला होता. ४५ दिवसांच्या सुट्टीमध्ये कुटुंब, नातेवाईक, सगेसोयरे, मित्र मंडळी आदिंच्या भेटीगाठी घेऊन १९ सप्टेंबर रोजी आगरताळा येथे कर्तव्यावर हजर झाला होता. सध्या त्रिपुरा राज्यातील आगरताळा येथील बांग्लादेशाच्या सीमेवर कार्यरत होता. काल दि. २५ नोव्हेंबर, सोमवारी कर्तव्य बजावत असतांनाच रात्री १२ वा. सुमारास हृदयविकाराच्या धक्क्याने त्याला वीरमरण आले. त्याच्या पश्र्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, आईवडील, दोन भाऊ, एक बहिण व बराच मोठा आप्त परिवार आहे.

आज दि.२८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता जवान प्रदीप घुगे यांचे पार्थिव आगरतळा येथून सिमा सुरक्षा दलाचे नरेंद्र भेदे व इंदौर येथील कमांडर अनिलकुमार सिंग, लोहित अस्वा जी, बालकिसन गौंड, मोहम्मद अजिम खान, राजेश कुमार मरोडिया, मोहन राज, ऋषी किशन, बिजेन्द्र, दिगन्ता दास, रामदिन सिंग हे घेऊन आले. याप्रसंगी घुगे यांचे राहते घरी नागरिकांचा एकच जमाव जमा झाला होता. आई,वडील,भाऊ बहीण, पत्नी,मुलगा, मुलगी व नातेवाईकांच्या दर्शनानंतर गावातून मिरवणूक काढत पार्थिव त्यांच्या शेतात अंतिम संस्कारासाठी नेण्यात आले.

### मुलगा योगीराज व लहान भाऊ शिक्षक संदीप यांनी दिला अग्नि

अखेरची मानवंदना देत श्रद्धांजली अर्पण करून शहीद प्रदीप घुगे यांचे ११ वर्षीय चिरंजीव योगीराज व त्यांचे लहान बंधू शिक्षक संदीप घुगे यांनी पार्थिवाला अग्नी दिला.

यावेळी नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार तोताराम कायंदे, प्रदेश सरचिटणीस इरफानअली शेख, जुनेद अली, एड.शर्वरी तुपकर, भाजपा जिल्हाउपाध्यक्ष प्रभाकर ताठे, डॉ. दशरथ शिंदे, माऊली मुंढे, डॉ. सुनील कायंदे, योगेश जाधव, कचरूजी भारस्कर, शिवसेना नेते गजेंद्र देशमुख, टि.एन.मोगल तर प्रशासनाच्यावतीने उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम, तहसिलदार अजित दिवटे, किनगावराजा ठाणेदार विनोद नरवाडे, ग्रामपंचायत अधिकारी अशोक बुरकुल, तलाठी यशवंत घरजाळे यांनी श्रद्धांजली वाहिली.

सिमा सुरक्षा बलाचे इन्दौरहुन आलेले कमांडर अनिलकुमार सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली लोहित अस्वा जी,बालकिसन गौंड,मोहम्मद अजिम खान,राजेश कुमार मरोडिया, मोहन राज, ऋषी किशन, बिजेन्द्र, दिगन्ता दास,रामदिन सिंग तर अगरतळा हुन नरेंद्र भेदे यांनी हवेत तीन राऊंड फायरिंग करत अंतिम सलामी देत अभिवादन केले.

यानंतर अगरतळा येथून शहीद जवान प्रदीप पंढरीनाथ घुगे यांचे पार्थिव सीमा सुरक्षा दलाचे सहाय्यक उपनिरीक्षक नरेंद्र भेदे हे घेऊन आले होते. यावेळी घुगे यांच्या पार्थिवाला अग्नि देण्यापुर्वी सीमा सुरक्षा दलाचे नरेंद्र भेदे यांनी आई, वडील,विरपत्नी, मुलगी व मुलगा यांच्याकडे तिरंगा ध्वज देत स्वातंत्र्यदिन व गणराज्य दिन आपल्या घरी तिरंगा फडकवून साजरा करावा असे सांगितले.

### फुलांचे भाव गडगडल्याने शेतकरी ,व्यापारी हवालदिल



**कल्याण/प्रतिनिधी** :प्लास्टिकच्या फुलांमुळे बाजारात झेंडूच्या फुलांची मागणी कमी झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांसह फुल व्यापारी देखील हवालदिल झाला आहे. परिणामी मागील काही दिवसापासून पिवळा झेंडू १० रुपये किलो,तर लाल झेंडू २० रुपये किलो दराने झेंडूची फुले विकली जात आहेत. या दरात शेतकरी ,व्यापायांचा खर्च देखील निघत नाही त्यातच ,दोन दोन दिवस फुलांना ग्राहक नसल्याने फुले कचऱ्यात फेकावी लागत आहेत. मागील काही दिवसात दहा रुपये किलो दराने देखील पिवळा झेंडू तर २० रुपये किलो दराने लाल झेंडूची विक्री होत आहे. फुलांना भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांसह व्यापारी देखील चिंतेत आहे.

### महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा, 'या' योजनेत राज्याने देशात मारली बाजी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्र सरकार सर्वसामान्य नागरिकांसाठी, महिलांसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना आर्थिक पाठबळ तसेच प्रोत्साहन देण्याचे काम केले जाते. अशीच केंद्र सरकारची एक योजना म्हणजे महिला सन्मान बचत योजना. सरकारने खास महिलांसाठी ही योजना सुरु केली आहे. आत्तापर्यंत देशभरातील ४३ लाख नवीन ठेवीदार या अल्पबचत योजनेत सामील झाले आहेत. या योजनेत महाराष्ट्रानं अव्वल क्रमांक मिळवला आहे. सरकार महिलांसाठी वेळोवेळी अनेक योजना आणत असते. २०२३ चा अर्थसंकल्प सादर करताना, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी महिला सन्मान बचत योजनेची विशेष योजना सुरू केली होती. ही योजना खास महिलांच्या गरजेनुसार तयार करण्यात आली आहे. या योजनेबाबत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील ४३ लाख नवीन ठेवीदार या अल्पबचत योजनेत सामील झाल्या आहेत. या योजनेत बचत प्रमाणपत्र दिले जाते, ज्याम ध्ये चक्रवाढ व्याज दिले जाते.

# भिवंडीत १२ वर्षानंतर भटक्या कुत्र्यांसाठी निर्बीजीकरण केंद्र पुन्हा सुरू : पालिका आयुक्त अजय वैद्य यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने १२ वर्षांनंतर बंद पडलेले कुत्र्यांचे निर्बीजीकरण केंद्र पुन्हा सुरू करण्यात आले आहे. शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. मागील वर्षभरात १४,००० हून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतला होता, तर एका दुर्दैवी घटनेत एका व्यक्तीचा मृत्यूही झाला होता. या पार्श्र्वभूमीवर कुत्र्यांचे निर्बीजीकरण केंद्र तातडीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विशेष म्हणजे, २०१२ मध्ये भिवंडीत काही कर्मचाऱ्यांकडून नऊ भटक्या कुत्र्यांना रॉकेल टाकून जाळल्याची गंभीर घटना घडली होती. या अमानुष प्रकारानंतर प्रचंड संताप व्यक्त झाला आणि निर्बीजीकरण केंद्र बंद करण्यात आले. त्यानंतर तब्बल १२ वर्षे निर्बीजीकरणाचे काम ठप्प असल्याने शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला होता.

शहरातील इदगाह रोड येथे उभारलेल्या या केंद्राचे उद्घाटन महानगरपालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. केंद्रात १०० हून अधिक कुत्र्यांना ठेवण्याची व्यवस्था असून, त्यांच्यावर उपचार



आणि निर्बीजीकरण करून त्यांना परत त्यांच्या परिसरात सोडले जाणार आहे. हैदराबादच्या 'वेट्स सोसायटी फॉर निमल वेल्फेअर असोसिएशन' या संस्थेला पाच वर्षांसाठी या कामाचा ठेका देण्यात आला आहे.

महत्त्वाचे म्हणजे, एका कुत्र्याचे निर्बीजीकरण करण्यासाठी सुमारे १,४५० रुपये खर्च येणार आहे. भिवंडी शहरात सुमारे १३,५०० भटके कुत्रे असून त्यांच्या निर्बीजीकरणाची जबाबदारी या संस्थेकडे आहे. यामुळे शहरातील कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येईल आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा उपद्रव कमी होईल, महानगरपालिकेने उचललेले हे पाऊल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्राणी कल्याणासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी व्यक्त केला.

# मेहकर मतदारसंघात विकासकामांना खंड पडू देणार नाही, पराभव झाला तरी विकास कामे सुरूच राहतील

## माजी आ. संजय रायमुलकर यांचे पत्रकार परिषदेत ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :मतदारांनी दिलेला कौल मान्य असून कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. संघर्षाची सुरुवात विरोधी बाजुने झालेली आहे. आम्ही संयम ठेवून आहोत, पण कोणी विपरीत वागले तर गप्प बसणार नाही, असा थेट इशारा माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दिला. ते दि.२७ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिला. तसेच केंद्र आणि राज्यात आमची भक्कम सत्ता आहे, मतदार संघातील विकासकामांना खंड न पडू देता यापुढेही मोठ्या प्रमाणात विकास कामे मेहकर मतदार संघात आणणार, आहे, अशी ग्वाही माजी आ. संयज रायमुलकर यांनी यावेळी दिली. यावेळी माजी आ. संजय रायमुलक म्हणाले की, मी तीन वेळा आमदार म्हणून विजयी झालो. मात्र यावेळी अल्पमताने पराभूत झालो. महाविकास आघाडीचे सिद्धार्थ खरात विजयी झाले. त्यानंतर शहरात काही अनुचित घटना घडल्या. माळीपेठमध्ये घडलेल्या जाळपोळ व दगडफेकीनंतर संचारबंदी जारी झाली. नंतर ती उठविण्यात आली. याप्रकरणी २६ जणांवर गुन्हा दाखल झाला. अनेकांना अटक झाली. आमदार सिद्धार्थ खरात यांनी पराभवातून शिवसेनेने मेहकरमध्ये असंतोष निर्माण केला आहे, असा



आरोप व्हायरल झालेल्या व्हिडिओ क्लिप मधून केला होता. यावर माजी आ. संजय रायमुलकर पत्रकार परिषदेत खुलासा केला. शिवसेना कार्यालयात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत रायमुलकर यांनी सांगितले की, मतमोजणीनंतर बाहेर आलेल्या आमच्या काही कार्यकर्त्यांवर दगडफेक झाली. त्यात ते जखमी झाले. यानंतर शिवसैनिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होऊन ते एकत्र आले. पण मी त्यांची समजूत काढून शांत राहण्याचे आवाहन केले. त्यानंतरही माळीपेठ भागात मरीमाता मंदिराजवळ हिरवा गुलाल फेकण्यात आला. नागरिकांवर दगडफेक आणि जाळपोळ करण्यात आली. हे सर्व अनुचित होते. मेहकर शहरच नव्हे तर मतदार संघात शांतता नांदावी, इथल्या नागरिकांना कुठलाही त्रास होऊ नये, ही आमची नेहमीसाठी भूमिका राहिलेली आहे आणि त्याप्रमाणे गतकाळात आम्ही वागलो.आम्ही पराभव मान्य केला असून आमचे कार्यकर्ते शांत आहेत. परंतु विजय उमेदवाराच्या बाजुने उन्माद दाखवल्या जात आहे, असा आरोप संजय रायमुलकर यांनी केला. मुंबईत बसून आमदार मी पोलिसांना काही लोकांची यादी देणार आहे असे व्हायरल झालेल्या त्यांच्या व्हिडिओतून कळले, असे सांगून रायमुलकर म्हणाले की, ज्यांचा घटनेची काही संबंध नाही, अशा लोकांना नाहक यात अडकवू नये. पोलिसांनी सर्व बाजुने तपास करावा. विपरीत काही घडले तर आम्ही गप्प बसणार नाही. मी नेहमी मतदार संघ हा एक परिवार समजत आलो आहे. मी कुठलाही जातीभेद कधीही केला नाही. विरोधकांचीही कामे मी केली. मुस्लिम वस्तींमध्ये शादीखाने, मागासवर्गीय वस्तींमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे मी केली. विरोधकांनी निवडणुकीत वैयक्तिक बदनामी केली. चुकीच्या गोष्टी लोकांमध्ये पसरवल्या, असा आरोप रायमुलकर यांनी केला. पराभवाची कारणे शोधू, आत्मचिंतन करू,असे ते म्हणाले. महाविकास आघाडीला येथे पाच वर्षे मिळाली आहेत,त्यांनी विकास कामे करावीत. मंजूर असलेली सर्व कामे पूर्ण करून घेण्यात येतील. त्यात कुणी खोडा घालण्याचा प्रयत्न केला तर वर सरकार आमचे आहे, हे त्यांनी लक्षात ठेवावे. आणखी मोठ्या प्रमाणावर विकास कामे मी आणणार आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मी आतापर्यंत कार्यरत राहिलो. पुढेही कार्यरत राहणार आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भरपूर प्रेम मिळाले. त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास कामे खेचून आणता आली. एका प्रश्नाला उत्तर देताना संजय रायमुलकर म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे यांनी यापूर्वी सांगितले आहे की, माझ्यासोबतच्या आमदारांना मी घरी बसू देणार नाही. त्यांच्या माध्यमातून निश्चितपणे चांगलेच घडेल.असा विश्र्वासही यावेळी माजी आ. संजय रायमुलकर यांनी व्यक्त केला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे शहर प्रमुख जयचंद बाठिया ,उपतालुकाप्रमुख समाधान साबळे, बबनराव तुपे प्रामुख्याने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री काळाता उद्धव ठाकरे यांची असहकार्याची भूमिका

मेहकर मतदार संघातील ज्या एक लाख लोकांनी मला मतदान केले. त्या सर्वांचे आभार मानतो,असे सांगून रायमुलकर म्हणाले की, निवडणुकीत जय पराजय होतच असतात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या कुठले सहकार्य मिळाले नाही, असे सांगून ते म्हणाले की पेनटाकळी प्रकल्पाच्या ११ किलोमीटर कालव्याचा प्रश्न २० वर्ष प्रलंबित राहिला. त्यासाठी प्रचंड प्रयत्न केले. शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका तासभरात ५८५ कोटी रुपयांची मंजुरी दिली. ते काम सुरू झाले आहे. याचा शेतकऱ्यांना भरपूर फायदा होईल. मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलण्याचा मी प्रयत्न केला. त्यासाठी चार हजार कोटी रुपयांची विकास कामे आणली. ही सर्व कामे पूर्ण करून मतदार संघात विकासकामांना खंड पडू न देता मतदार संघात विकास कामाची गंगा वाहेल, असा विश्र्वास यावेळी माजी आ. संजय रायमुलकर यांनी व्यक्त केला.

## विविध वृत्त...

### नवउद्योजकांनी स्टँड अप इंडिया योजनेचा लाभ घ्यावा; समाज कल्याण विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांसाठी केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागातर्फे करण्यात आले आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांनी, उद्योग आधार नोंदणी पत्र, जात प्रमाणपत्र, बँकेचे कर्ज मंजूरीची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत. सदर योजनेतील सवलतीस पात्र नवउद्योजकांनी १० टक्के स्वहिस्सा भरण केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅण्ड अप इंडिया योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास दि. २० डिसेंबर २०२४ पर्यंत सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

### जिल्हयातील आरोग्य संस्थाना नवीन रुग्ण वाहिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते लोकार्पण सोहळा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा परिषद आरोग्य विभाग बुलडाणा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, गुलाब खरात व जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गिते यांच्या उपस्थितीत बुलडाणा जिल्हयातील आरोग्य संस्थाना नवीन रुग्णवाहिकांचा लोकार्पण सोहळा आज पार पाडला. रुग्णवाहिका वाहन चालकास चावा देऊन वाहना विषयी समुपदेशन करण्यात आले. यावेळी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ मिलींद जाधव, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. रंजीत मंडाले, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. पुरी तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

### एकनाथ शिंदे केंद्रात तर त्यांच्या चिरंजीवांना उपमुख्यमंत्री करतील - रोहित पवार



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : विधानसभेत बहुमत मिळाल्यानंतरही सत्तास्थापनेवरून हालचालींचा वेग मंदावला होता. मात्र एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेची भूमिका स्पष्ट केली आहे आणि भाजपच्या मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाचा रस्ता मोकळा झाला आहे. 'दिल्लीत अमित शाह यांच्या उपस्थितीत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या बैठकीपूर्वी एकनाथ शिंदेंनी पत्रकार परिषद घेतली आणि शिवसेनेची कोणतीही आडकाठी नाही किंवा माझी कोणतीही अडचण नाही. हे स्पष्ट केल्याचे पाहायला मिळाले. यावर शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. अजितदादांना मुख्यमंत्रिपद दिलं तर मी स्वतः जाऊन अभिनंदन करेन, पार्टी म्हणून नाही तर माझे काका म्हणून मी त्यांना शुभेच्छा देईल, असं वक्तव्य रोहित पवार यांनी केलं आहे. अजित पवार यांच्या मुख्यमंत्रिपदासंदर्भात केलेल्या प्रश्नावर रोहित पवार यांनी आपली प्रतिक्रिया दिली. यासोबतच एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेवर बोलताना रोहित पवार म्हणाले, 'एकनाथ शिंदे केंद्रात तर त्यांच्या चिरंजीवांना उपमुख्यमंत्री करतील'

### परप्रांतीय व्यक्तिकडून आईसह मुलीला बेदम मारहाण, सर्व घटना सीसीटीवी कॅमेऱ्यात कैद

**मुंबई/प्रतिनिधी** : विरारमध्ये किरकोळ कारणावरुन एका परप्रांतीय व्यक्तीने आई आणि मुलीला बेदम मराहाण केल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण मारहाणीची घटना सीसीटीवी कॅमेऱ्यात कैद झाली आहे. काल २७ नोव्हेंबर बुधवारी रात्री ९:४५ वाजता विरार पूर्वेच्या विवा जहागीड कॉम्प्लेक्स तुलशीधाम सोसायटीतील तिसऱ्या माळ्यावर रुम नंबर ३०२ समोर ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सीसीटीवी मध्ये तर एक पुरुष अर्धनग्न दिसत आहे आणि तो महिलेचे केस पकडून तिला बेदम मारहाण करत असल्याचे दिसत आहे. म हिला व पुरुष एकाच इमारतीत शेजारी राहणारे असून दरवाज्यावरील खिळा ठोकण्याच्या कारणावरुन ही मारहाण झाली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. गौतम पांडे,आणि त्याची पत्नी प्रतिभा पांडे,असे गुन्हा दाखल झालेल्या पती पत्नीचे नावे आहे. रीना धुरी आणी निशा धुरी असे मारहाण झालेल्या आई आणी मुलीचे नाव आहे.

# नागरिकांसाठी डाक जीवन विमा कल्याणकारी योजनेची सुरूवात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा ह्या योजना नागरिकांना विमासुरक्षा देण्याकरिता चालविल्या जातात. यामधील डाक जीवन विमा ह्या कल्याणकारी योजनेची सुरूवात ०१ फेब्रुवारी १८८४ ला करण्यात आली, यामध्ये सुरूवातीला फारच कमी लोकांना या योजनेचा लाभ घेता येत असे आता ह्या आता मात्र ह्या योजनेची व्याप्ती वाढून आता खालील लोकांना सुध्दा सहभाग होता येते. केंद्र सरकारचे कर्मचारी ,राज्या सरकारचे कर्मचारी, स्थानिक स्वराज्या संस्थाचे कर्मचारी, भारतीय रिझर्व बँक, सरकारी बँक, खासगी बँक चे कर्मचारी शैक्षणिक संस्था शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ चे कर्मचार, सनदी लेखापाल,वकील डॉक्टर, एनएससी,बीएससी वर सूचिबध्द झालेल्या कंपन्यांतील कर्मचारी, सर्व पदवीधर व डिप्लोमाधारक तसेच ग्रामीण डाक जीवन विमा ही योजना २४ मार्च १९९५ ला ग्रामीण भागातील नागरिकांना विमा सुरक्षा प्रदान करण्यासाठी सुरु करण्यात आली. वय वर्षे १८ ते ५५ या वयोगटातील ग्रामीण भागातील रहिवासी या योजनेचा लाभ घेऊ शकतो. भारतीय डाक विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या योजना कमी प्रीमिअम जास्त बोनस ह्यामुळे नागरिकांच्या पसंतीस उतरत आहेत. आतापर्यंत जवळपास दीड कोटीहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे. उत्कृष्ट परतावा देणाऱ्या विमा योजनेचा लाभ सर्व नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता दि. ४ डिसेंबर २०२४ ला विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये संपर्क साधण्याचे आवाहन डाक अधीक्षक, गणेश आंभोरे बुलडाणा विभाग, यांनी केले आहे.

### अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत ही पहिल्या दिवसापासून आम्हा सर्वांची इच्छा : रुपाली चाकणकर

**पुणे/प्रतिनिधी** : राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून पाच दिवस झाले तरी महायुतीकडून मुख्यमंत्री कोण याचं काही निश्चित होत नाहीये.अशातच आज राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत, अशी कार्यकर्ता म्हणून पहिल्या दिवसापासून आम्हा सर्वांची इच्छा असल्याचं सांगितलंय. १३४ व्या महात्मा फुले पुण्यतिथीच्या निमित्ताने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पुण्यातील महात्मा फुले वाडा येथील महात्मा फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी त्यांना याबाबत विचारलं असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलंय.

यावेळी रुपाली चाकणकर यांना महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाबाबत विचारलं असता त्या म्हणाल्या की, राज्यातील सर्वच जनतेला उत्सुकता आहे की, म हायुतीकडून कोण मुख्यमंत्री होणार आहे. राज्यातील तिन्ही पक्षाचे नेते आज दिल्लीला गेले असून, आज यावर चर्चा होणार आहे.

# शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम पिक स्पर्धा; सहभागी होण्यासाठी कृषि विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी येत्या हंगामात खरीप हंगाम पिक स्पर्धा घेण्यात येत आहे. यात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे. शेतीची उत्पादकता वाढावी, यासाठी शेतकरी विविध प्रयोग करतात, अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देवून विजेत्या शेतकऱ्यांना गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढते. ते अधिक उमेदीने नवनवीन आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास पुढे येतात. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल, तसेच परिसरातील इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक होवून जिल्ह्याच्या उत्पादनात भर पडेल, यासाठी कृषि विभागातर्फे पिक स्पर्धा घेण्यात येत आहे.

पिक स्पर्धेतील जिल्ह्याकरिता रब्बी हंगामातील स्पर्धेसाठी ज्वारी, गहू,हरभरा,करडई व जवस पिके समाविष्ट करण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी शेतकऱ्याकडे स्वत:च्या नावावर जमीन असणे आणि ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. तसेच एकावेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. लाभार्थीचे शेतामध्ये त्या पिकाखालील किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पिकस्पर्धेसाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज स्पर्धेकरिता पात्र राहतील. पिक स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळविलेल्या शेतकऱ्याला पुढील पाच वर्षे त्याच पिकाकरीता पिक स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. सर्वसाधारण गटासाठी प्रवेश शुल्क पिकनिहाय प्रत्येकी ३०० रुपये, तर आदिवासी गटासाठी १५० रूपये राहणार आहे. मुग आणि उडीद पिकासाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम दि. ३१ डिसेंबर २०२४ आहे. पिकस्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी अर्ज विहित नमुन्यामध्ये भरून त्यासह प्रवेश शुल्क चलन, सातबारा, आठ अ चा उतारा आणि अनुसूचित जमातीचा असल्यास जात प्रमाणपत्र संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत. पुरेशे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या पिकाची पिकस्पर्धा संबधित तालुका कृषि अधिकारी जाहीर करतील.

तालुका पातळीस्तरावर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले पाच हजार रूपये, दुसरे तीन हजार रूपये, तिसरे दोन हजार रूपये बक्षीस देण्यात येणार आहे. जिल्हा पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले १० हजार रूपये, दुसरे सात हजार रुपये, तिसरे पाच हजार रूपये बक्षीस असणार आहे. राज्य पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले ५० हजार रुपये, दुसरे ४० हजार रुपये, तिसरे ३० हजार रुपये बक्षीस असणार आहे.

पिकस्पर्धेच्या मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या ु.ज्ञीळीहळ. ारहरीरीहींर.सीीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कृषि अधीक्षक कृषि अधिकारी एम.डी.ढगे यांनी केले आहे.

# एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत याकरिता शिवसेना शिंदे गटाकडून गजानन महाराजांना साकडे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय झाला असून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मुख्यमंत्रीपदाची चर्चा सुरू असून शिंदे गटाकडून एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे आज बुलढाण्यातील विष्णूवाडी परिसरात असलेल्या गजानन महाराज मंदिरात शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी शिंदे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी संत श्री गजानन महाराजांना साकड घातले आहे.





यावेळी आमदार संजय गायकवाड म्हणाले की, एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत या भावनेपोटी आम्ही गजानन महाराजांना साकडं घातलं आहे. शेतकरी लाडक्या बहिणी या सगळ्यांनी एकनाथ शिंदेंनी पुन्हा मुख्यमंत्री या राज्याची धुरा सांभाळावी.. तसेच ते पुढे म्हणाले की, भाजपचा मुख्यमंत्री होईल असं एकनाथ शिंदे हे काही बोलले नाही.मी पत्रकार परिषद पूर्ण पाहिली. त्यामध्ये नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना सांगितलं की शिवसेना आपल्या पाठीशी आहे. जो निर्णय तुम्ही घ्याल तो आम्हाला मान्य आहे अशी भूमिका त्यांनी मांडली. आणि म्हणून आमची गजानन महाराज, अमित शहा यांना आणि नरेंद्र मोदींना निश्र्चितच ही शक्ती देतील त्यांच्या मुखात न आमच्या एकनाथ शिंदे साहेबांचं नाव मुख्यमंत्री म्हणून येईल.तर सहा महिने आधी लोकसभेच्या निवडणुका झाल्या तर फार फुलक्या मारल्या आम्ही जिंकलो जिंकलो म्हणून.. सहा महिन्यातच सगळ्या मशीन बिघडल्यात का? आता बुलढाणा ८०० मताचा फरक राहिला फक्त मग इथेही र्शीी मशीन खराब होती का? तिकडे आदित्य ठाकरे जिंकतो किंवा त्यांचे १६ येतात मग कोणीच आलं नसतं. यांनी पराभव मान्य केला पाहिजे.. रडणं सोडलं पाहिजे यांना जनतेने नाकारलेलं आहे एकनाथ शिंदेंचा नेतृत्व महाराष्ट्राने मान्य केलेला आहे हा परिणाम त्याचा आहे एवढ्या जागा या ठिकाणी आलेले आहेत.